# प्रकरण VII

# पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अग्निशमन सेवा पुरवण्यातील परिणामकारकता

# प्रकरण VII

# पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अग्निशमन सेवा पुरवण्यातील परिणामकारकता

संविधानाच्या बाराव्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध केलेली 18 कार्ये पार पाडण्यासाठी अधिकार आणि जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण, हे नागरिकांना सेवा वितरणाची परिणामकारकता मोठया प्रमाणावर वाढवण्याच्या उद्देशाने होते. वितरणाची परिणामकारकता तपासण्यासाठी लेखापरीक्षेद्वारे पाणीपुरवठा, स्वच्छता आणि अग्निशमन सेवा या तीन कार्यांची निवड करण्यात आली.

## 7.1 पाणीपुरवठा सेवा पुरवण्यातील परिणामकारकता

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 261, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 63(20) आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियमाच्या कलम 49(1) नुसार, सार्वजनिक आणि खाजगी प्रयोजनासाठी पुरेसा पुरवठा होण्यासाठी आवश्यक असलेल्या नगरपालिका जल कामांचे व्यवस्थापन आणि अधिग्रहण यासाठी वाजवी आणि पुरेशी तरतूद करणे नागरी स्थानिक संस्थांवर बंधनकारक होते.

नगर विकास मंत्रालय, भारत सरकारद्वारे चार प्रमुख क्षेत्रे जसे की पाणीपुरवठा, मलनिःसारण व्यवस्थापन (मलनिःसारण आणि स्वच्छता), घनकचरा व्यवस्थापन, पर्जन्यजल निःसारण यामध्ये सेवा स्तर निकष जाहीर (जुलै 2008) केले आहेत. नागरी स्थानिक संस्थांच्या कामगिरीचे निरिक्षण व मूल्यमापन करण्यासाठी या प्रमुख क्षेत्रासाठी सेवास्तर निर्देशांक निश्चित केले होते. भारत सरकारद्वारे विहित केलेले सेवा स्तर निकष सर्व नागरी स्थानिक संस्थांनी साध्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वीकृत (फेब्रुवारी 2010) केले. नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी जारी (ऑक्टोबर 2010) केलेल्या निर्देशांनुसार, नागरी स्थानिक संस्थांनी प्रत्येक आर्थिक वर्षात सेवा स्तर साध्य करण्यासाठी लक्ष निश्चित करणे आणि या लक्ष्यांच्या साध्यतेचा तपशील राज्य शासनाला सादर करणे आवश्यक होते. राज्य शासनाने निश्चित केलेल्या लक्ष्यांनुसार नागरी स्थानिक संस्थांमधील लक्ष्य आणि साध्य दर्शविणारी वार्षिक अधिसूचना जारी करते.

चाचणी-तपासणी केलेल्या 44 नागरी स्थानिक संस्थांमधील भारत सरकारने निश्चित केलेल्या काही सेवा स्तर निकष निर्देशकांच्या तूलनेत केलेली साध्यता आणि 38 नागरी स्थानिक संस्थांच्या (बृहन्मुंबई, नागपूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, ठाणे, वसई-विरार या सहा नागरी स्थानिक संस्थांनी स्वतःची लक्ष्ये जाहीर केली नाहीत) संदर्भात वर्ष 2019-20 च्या अंतर्गत लक्ष्यांच्या तुलनेत केलेली साध्यता पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिली आहे.

### 7.1.1 पाणीपुरवठा जोडणी

सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, पाणी पुरवठा जोडणी म्हणजेच, घरामध्ये पाणी पुरवठ्यासाठी थेट पाईप जोडणीची 100 टक्के व्याप्ती परिकल्पित केली होती. लेखापरीक्षेने चाचणी-तपासणी केलेल्या 42 नागरी स्थानिक संस्थांमधील[1] पाणी पुरवठा जोडणीच्या व्याप्तीचे विश्लेषण केले जे **तक्ता 7.1** मध्ये सारांशित केले आहे.

**तक्ता 7.1: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये पाणी पुरवठा जोडणीची व्यापकता**

| पाणी पुरवठा जोडणीची व्याप्ती (टक्के) | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 7 |
| 75 पेक्षा जास्त परंतु 100 पेक्षा कमी | 20 |
| 50 पेक्षा जास्त परंतु 75 पेक्षा कमी | 15 |
| 25 पेक्षा जास्त परंतु 50 पेक्षा कमी | 0 |
| 25 पेक्षा कमी | 0 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी दिलेली माहिती* | |

- चाचणी-तपासणी केलेल्या 42 नागरी स्थानिक संस्थांपैकी फक्त सात नागरी स्थानिक संस्थांनी (17 टक्के) 100 टक्के पाणीपुरवठा जोडणी साध्य केली (**परिशिष्ट** 7.1).
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्थांपैकी एका नागरी स्थानिक संस्थेने (भातकुली) माहिती सादर केली नव्हती. उर्वरित 37 नागरी स्थानिक संस्थांपैकी 38 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (37 पैकी 14) त्यांचे स्वतःचे लक्ष्य साध्य केले होते, तर 62 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (37 पैकी 23) स्वतःचे लक्ष्य साध्य केले नव्हते **(परिशिष्ट 7.2).**

अशाप्रकारे, बहुसंख्य चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्था सेवा स्तर निकष निर्देशकानुसार पाणीपुरवठा जोडणीची व्याप्ती साध्य करण्यात अयशस्वी ठरल्या होत्या.

### 7.1.2 दरडोई पाणी पुरवठा

दरडोई पुरवठा केले जाणारे पाणी, जे प्रति व्यक्ती प्रति दिन लिटर मध्ये दर्शविले जाते, हे उगमस्थानी पिण्यायोग्य निकषांनुसार पाणी प्रक्रिया करून आणि वितरण प्रणालीमधून पुरवठा करण्याची नागरी स्थानिक संस्थांची पर्याप्तता सूचित करते. सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, 135 लिटर प्रति व्यक्ती प्रति दिनाचा पाणीपुरवठा करणे आवश्यक होते. चाचणी-तपासणी केलेल्या 42 नागरी स्थानिक संस्थांमधील[2] पाण्याच्या दरडोई पाणीपुरवठ्याचे, लेखापरीक्षेद्वारे केलेले विश्लेषण **तक्ता 7.2** मध्ये सारांशित केले आहे.

[1] (1) भातकुली आणि (2) यवतमाळ नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नव्हती

[2] (1) भातकुली आणि (2) यवतमाळ नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नव्हती

**तक्ता 7.2: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये दरडोई पाण्याचा पुरवठा**

| **दरडोई पाण्याचा पुरवठा** | **नागरी स्थानिक संस्थांची संख्या** |
|---|---|
| 135 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिन आणि वर | 13 |
| 67.50 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिन ते 135 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिन | 25 |
| 33.75 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिन ते 67.50 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिवस | 4 |
| 33.75 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिनापेक्षा कमी | 0 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी दिलेली माहिती* | |

- चाचणी-तपासणी केलेल्या 42 नागरी स्थानिक संस्थांपैकी 13 नागरी स्थानिक संस्था वगळता, उर्वरित 29 नागरी स्थानिक संस्थांनी (69 टक्के) 135 लिटर प्रति व्यक्ती प्रतिदिन पाण्याचा दरडोई पुरवठा केला नव्हता **(परिशिष्ट 7.1)**.
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी लक्ष्ये प्रकाशित केली होती, पैकी एका नागरी स्थानिक संस्थेने (भातकुली) माहिती सादर केली नव्हती. उर्वरित 37 नागरी स्थानिक संस्थांपैकी 16 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (37 पैकी सहा) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते, तर 84 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (37 पैकी 31) स्वतःचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले नव्हते **(परिशिष्ट 7.2)**.

अशाप्रकारे, नागरी स्थानिक संस्था बऱ्याच अंशी आपल्या नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा करू शकल्या नाहीत.

### 7.1.3 जल जोडणीच्या मापनाची व्याप्ती

पाणी पुरवठा प्रणालीमध्ये, नागरिकांना पुरवठा केलेल्या पाण्याचे थेट मोजमापन करता येते आणि म्हणूनच सर्व स्तरावरील नागरिकांना पुरवठा केलेल्या पाण्याचे मापन करणे आवश्यक होते. जलमापकामुळे पाण्याचा वापर कार्यक्षमतेने करण्यास प्रवृत्त करते. सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, 100 टक्के जलमापन साध्य करावयाचे होते. चाचणी-तपासणी केलेल्या 39 नागरी स्थानिक संस्थांमधील[3] जलमापकाच्या व्याप्तीचे लेखापरीक्षेद्वारे केलेले विश्लेषण **तक्ता 7.3** मध्ये सारांशित केले आहे.

**तक्ता 7.3: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये पाणी जोडणीच्या जलमापनाची व्याप्ती**

| **जलमापनाची व्याप्ती** | **नागरी स्थानिक संस्थांची संख्या** |
|---|---|
| मापक नाही | 26 |
| 100 टक्के | 4 |
| 50 टक्क्यांहून अधिक परंतु 100 टक्क्याहुन कमी | 5 |
| 25 टक्क्यांहून अधिक परंतु 50 टक्क्याहुन कमी | 4 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 0 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी दिलेली माहिती* | |

3 पाच नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

- **तक्ता 7.3** मध्ये दर्शविल्यानुसार, चाचणी-तपासणी केलेल्या 39 पैकी 26 नागरी स्थानिक संस्थांमध्ये (67 टक्के) पाणी जोडणीचे कोणतेही मापक नव्हते **(परिशिष्ट 7.1)**. लेखापरीक्षेमधे असे आढळून आले की, बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये 4.37 लाख जलमापन केलेल्या जोडण्यांपैकी 1.84 लाख जलमापक (42 टक्के) सदोष होती.
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था ज्यांनी लक्ष्य प्रकाशित केले होते त्यापैकी 26 नागरी स्थानिक संस्थांमध्ये, एकतर लक्ष्य शासकीय अधिसूचनेमध्ये शून्य दर्शविली होती किंवा साध्यता उपलब्ध नव्हती. उर्वरित 12 नागरी स्थानिक संस्थांपैकी, 25 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (12 पैकी तीन) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते, तर 75 टक्के नागरी स्थानिक संस्था (12 पैकी 9) स्वतःचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले नव्हते. **(परिशिष्ट 7.2)**.

जलजोडणी मापकांच्या अभावी बीजके ही निर्धारण आधारावर तयार केल्याने महसुलाची हानी अपरिहार्य होती. हे पाण्याच्या वापरातील अकार्यक्षमतेकडे सुद्धा नेते कारण जलजोडण्यांचे मापन हे ग्राहकांद्वारे पाण्याच्या अपव्ययास अटकाव करण्याचे कार्य करते.

### 7.1.4 पुरवठा केलेल्या पाण्याची गुणवत्ता

निकृष्ट दर्जाचे पाणी सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकते. पुरवठा केलेल्या पाण्याची गुणवत्ता 100 टक्के पिण्यायोग्य असावी. नागरी स्थानिक संस्थांद्वारे पाण्याची गुणवत्ता शासन किंवा शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडे नमुना पाठवून तपासली जाते.

चाचणी-तपासणी केलेल्या 40 नागरी स्थानिक संस्थांमध्ये[4] पुरवठा केलेल्या पाण्याची गुणवत्ता लेखापरीक्षेने विश्लेषित करून **तक्ता 7.4** मध्ये सारांशित केली आहे.

**तक्ता 7.4: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमधील पाणी पुरवठयाची गुणवत्ता**

| पाण्याची पिण्यायोग्य क्षमता (टक्केवारी मध्ये) | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 23 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 12 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 पेक्षा कमी | 4 |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 1 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | निरंक |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहीती* | |

- **तक्ता 7.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी- तपासणी केलेल्या 40 पैकी 17 नागरी स्थानिक संस्थांमध्ये (42 टक्के) पाण्याची गुणवत्ता 100 टक्के पिण्यायोग्य

[4] (1) भातकुली, (2) खामगाव, (3) तळा आणि (4) यवतमाळ ह्या नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

नव्हती. लातूर नागरी स्थानिक संस्थेमध्ये पाण्याची गुणवत्ता अतिशय निकृष्ट जी 27.70 टक्के होती **(परिशिष्ट 7.1)**.

- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी लक्ष्य प्रकाशित केली होती, पैकी चार नागरी स्थानिक संस्थांमध्ये (भातकुली, लाखनी, मोहाडी आणि तळा) लक्ष्य उपलब्ध नव्हती. उर्वरित 34 नागरी स्थानिक संस्थांपैकी 76 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (34 पैकी 26) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते, तर 24 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (34 पैकी आठ) स्वतःचे अंतर्गत लक्ष्य साध्य करू शकले नव्हते **(परिशिष्ट 7.2)**.

अशाप्रकारे, बहुसंख्य नागरी स्थानिक संस्था सेवास्तर निकष निर्देशकानुसार त्यांच्या नागरिकांना पिण्यायोग्य पाण्याचा पुरवठा साध्य करू शकल्या नाहीत.

### 7.1.5 पाणी पुरवठा सेवेची आर्थिक शाश्वतता

सर्व मूलभूत नागरी सेवांसाठी आर्थिक स्थिरता महत्त्वाची आहे. पाणी पुरवठ्यासारख्या सेवांमध्ये, ग्राहकांना मिळणारे फायदे अधिक थेट असतात आणि परिमाणित केले जाऊ शकतात. म्हणून, वापरकर्ता शुल्क, शुल्क आणि कर यांच्या संयोजनाद्वारे, सर्व परिचालन खर्च वसूल केले जावे. एकूण खर्चाच्या वसुलीचे मोजमाप करण्यासाठी "पाणी पुरवठा सेवांमधील खर्च वसुली" चा सेवा स्तर निकष निर्देशक महत्त्वपूर्ण आहे आणि दर निश्चितीसाठी आधार प्रदान करतो.

चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्थांमधील[5] खर्चाच्या वसुलीच्या व्याप्तीचे लेखापरीक्षणाद्वारे विश्लेषण करण्यात आले ज्याचा सारांश **तक्ता 7.5** मध्ये दिला आहे.

**तक्ता 7.5: चाचणी- तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमधे पाणी पुरवठ्याच्या खर्चाची वसुली**

| खर्चाची वसुली | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के आणि वर | 4 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 9 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 टक्क्यांपेक्षा कमी | 14 |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 6 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 3 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

**तक्ता 7.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्थांपैकी 34 मध्ये (89 टक्के), आकारले जाणारे पाणी शुल्क पुरवठा खर्च पूर्ण करण्यासाठी पुरेसे नव्हते **(परिशिष्ट 7.1)**.

- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी आपली लक्ष्य प्रकाशित केली आहेत, त्यापैकी एका नागरी स्थानिक संस्थेने (भातकुली) माहिती

---

[5] (1) अलिबाग, (2) भातकुली, (3) इचलकरंजी, (4) खामगाव, (5) तळेगाव-दाभाडे आणि (6) यवतमाळ ह्या नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

सादर केली नव्हती. उर्वरित 37 नागरी स्थानिक संस्थांपैकी 30 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (37 पैकी 11) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते तर 70 टक्के नागरी स्थानिक संस्था (37 पैकी 26) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य करू शकल्या नाहीत **(परिशिष्ट 7.2)**.

खर्च वसूल करण्यात नागरी स्थानिक संस्था अयशस्वी होण्याचे मुख्य कारण म्हणजे वेळोवेळी पाणी पुरवठ्याच्या खर्चाचा विचार करून पाणी शुल्काची सुधारणा न करणे. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की काटोल, लातूर, नंदुरबार, रामटेक आणि साक्री या पाच नागरी स्थानिक संस्थांमध्ये दहा वर्षांहून अधिक काळ पाणी शुल्क सुधारित केले नव्हते. तसेच, **परिच्छेद 7.1.3** मध्ये चर्चिल्यानुसार, पाण्याच्या जोडण्यांचे मापन न केले जाणे, हे सुद्धा नागरी स्थानिक संस्थांकडून पाणी पुरवठा सेवेचा खर्च वसूल न होण्यासाठीचे एक महत्वाचे कारण होते.

पुढे असे निदर्शनास आले की संकलन कार्यक्षमता देखील निकृष्ट होती ज्यामुळे पाणी पुरवठा सेवांमधील वित्तीय शाश्वतता आणखी ढासळली. चाचणी-तपासणी केलेल्या 40 नागरी स्थानिक संस्थांमध्ये[6] पाणी पुरवठा शुल्काच्या संकलन कार्यक्षमतेचे विश्लेषण **तक्ता 7.6** मध्ये सारांशित केले आहे.

**तक्ता 7.6: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये पाणी पुरवठा शुल्काची संकलन कार्यक्षमता**

| संकलन कार्यक्षमता | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 90 टक्क्यांपेक्षा जास्त | 5 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 90 टक्क्यांपेक्षा कमी | 5 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 टक्क्यांपेक्षा कमी | 13 |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 9 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 8 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

- **तक्ता 7.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 40 पैकी 35 नागरी स्थानिक संस्थांमध्ये (88 टक्के), संकलन कार्यक्षमता 90 टक्क्यांपेक्षा कमी होती **(परिशिष्ट 7.1)**.
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी आपली लक्ष्य प्रकाशित केली होती, त्यापैकी एका नागरी स्थानिक संस्थेने (भातकुली) माहिती सादर केली नाही. उर्वरित 37 नागरी स्थानिक संस्थांपैकी 19 टक्के नागरी स्थानिक संस्था (37 पैकी सात) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य करू शकल्या तर 81 टक्के नागरी स्थानिक संस्था (37 पैकी 30) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य करू शकल्या नाहीत **(परिशिष्ट 7.2)**.

[6] (1) अलिबाग, (2) भातकुली, (3) खामगाव आणि (4) यवतमाळ ह्या नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

अशाप्रकारे, पाणी शुल्क आणि खर्च यांच्या कमी वसुलीमुळे पाणीपुरवठा सेवेच्या आर्थिक स्थिरतेवर परिणाम झाला.

## 7.2 मलनिःसारण आणि स्वच्छता सेवा पुरवण्यातील परिणामकारकता

अतिसार, आमांश, हेपेटायटीस ए, विषमज्वर (टायफॉइड), डेंग्यू, हिवताप (मलेरिया) यांसारख्या अनेक रोगांच्या प्रसाराशी निकृष्ट स्वच्छता निगडीत आहे. योग्य स्वच्छतेच्या अभावामुळे केवळ मानवी आरोग्यावरच परिणाम होत नाही तर पर्यावरणाचा देखील -हास होतो. स्वच्छता सेवा पुरवण्याचे कार्य महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांना बंधनकारक आहे. भारत सरकारने नियत केलेल्या काही सेवा स्तर निकष निर्देशकाच्या तुलनेत चाचणी-तपासणी केलेल्या 44 नागरी स्थानिक संस्थांची कामगिरी आणि सन 2019-20 वर्षासाठीचे 38 नागरी स्थानिक संस्थांच्या (बृहन्मुंबई, नागपूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, ठाणे व वसई-विरार या सहा नागरी स्थानिक संस्थांनी त्यांचे अंतर्गत लक्ष्य प्रकाशित केले नव्हते) अंतर्गत लक्ष्याच्या तुलनेत केलेली कामगिरी पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिली आहे.

### 7.2.1 शौचालयांचे व्याप्ती क्षेत्र

हे निर्देशक नागरिकांना शौचालयाची उपल्बधता किती प्रमाणात आहे हे दर्शविते. सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, शौचालयाचे व्याप्तीक्षेत्र 100 टक्के असावे. चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमधील शौचालय असलेल्या घरांच्या व्याप्तीक्षेत्राचे लेखापरीक्षेद्वारे विश्लेषण करण्यात आले ज्याचा सारांश **तक्ता 7.7** मध्ये दिला आहे.

**तक्ता 7.7: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये शौचालय असलेल्या घरांचे व्याप्तीक्षेत्र**

| शौचालय असलेल्या घरांचे व्याप्तीक्षेत्र | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 41 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 3 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

- **तक्ता 7.7** मध्ये दर्शविल्याप्रमाणे तीन नागरी स्थानिक संस्थानी (सिल्लोड, त्र्यंबक आणि यवतमाळ) 100 टक्के शौचालयाच्या उपलब्धतेचे लक्ष साध्य केले नाही **(परिशिष्ट 7.3)**.
- 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी लक्ष प्रकाशित केले होते त्यापैकी 95 टक्के (38 पैकी 36) चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांनी अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते तर दोन नागरी स्थानिक संस्थांनी त्यांचे स्वतःचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले नव्हते **(परिशिष्ट 7.4)**.

### 7.2.2 मलनिःसारण जाळयांच्या जोडणीचे व्याप्तीक्षेत्र

हे निर्देशक भूमिगत मलनि:सारण (किंवा मलनि:सारण संकलन) जाळे किती प्रमाणात निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक यांसारख्या वैयक्तिक मालमत्तांपर्यंत पोहोचले

आहे हे दर्शविते. सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, मलनिःसारण जाळयांच्या जोडणीचे व्याप्तीक्षेत्र 100 टक्के करणे आवश्यक होते.

चाचणी-तपासणी केलेल्या 42 नागरी स्थानिक संस्थांमधील[7] मलनिःसारण जाळयांच्या जोडणीच्या व्याप्तीक्षेत्राचे लेखापरीक्षेद्वारे विश्लेषण केले ज्याचा सारांश **तक्ता 7.8** मध्ये दिला आहे.

**तक्ता 7.8: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये मलनिःसारण जाळ्याच्या जोडणीचे व्याप्तीक्षेत्र**

| मलनिःसारण जाळ्याच्या जोडणीचे व्याप्तीक्षेत्र | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 1 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 7 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 टक्क्यांपेक्षा कमी | 4 |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 1 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 29 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

- **तक्ता 7.8** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 42 पैकी 41 (98 टक्के) नागरी स्थानिक संस्थांनी मलनिःसारण जाळयांच्या जोडणीचे व्याप्तीक्षेत्र पूर्णत: साध्य केले नव्हते **(परिशिष्ट 7.3)**.
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था ज्यांनी लक्ष्य प्रकाशित केले होते त्यापैकी 31 नागरी स्थानिक संस्थांमधील शासकीय अधिसूचनेत एकतर लक्ष्य शून्य होते किंवा साध्य उपलब्ध नव्हते. उर्वरित सात नागरी स्थानिक संस्थांपैकी 86 टक्के (सात पैकी सहा) नागरी स्थानिक संस्था त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य करू शकले नाहीत, तर एका नागरी स्थानिक संस्थेने (महाबळेश्वर) तिचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते **(परिशिष्ट 7.4)**.

अशाप्रकारे, सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, बहुसंख्य नागरी स्थानिक संस्था प्रभावी भूमिगत मलनि:सारण जाळयांच्या जोडणी पुरवण्यात अयशस्वी ठरल्या.

### 7.2.3 मलनि:सारण जाळयांच्या संकलन कार्यक्षमता

ह्या निर्देशकात नागरी स्थानिक संस्थांमधील प्रमाणक स्थापक (नॉर्मेटिव्ह) मलनिःसारण निर्मितीच्या टक्केवारीच्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या संकलनाचे प्रमाण म्हणून परिगणित केले जाते. चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांमधील[8] मलनिःसारण जाळयांच्या संकलन कार्यक्षमतेचे विश्लेषण लेखापरीक्षेद्वारे करण्यात आले ज्याचा सारांश **तक्ता 7.9** मध्ये दिला आहे.

---

[7] (1) चोपडा आणि (2) धामणगाव नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

[8] (1) बार्शी, (2) भातकुली, (3) चोपडा, (4) धामणगाव, (5) खुलताबाद, (6) मोटाळा, (7) निलंगा, (8) साक्री, (9) शिराळा आणि (10) यवतमाळ या नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

**तक्ता 7.9: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये सांडपाणी जाळ्यांची संकलन कार्यक्षमता**

| मलनि:सारण जाळ्यांची संकलन कार्यक्षमता | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 5 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 1 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 टक्क्यांपेक्षा कमी | 5 |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 1 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 22 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

- **तक्ता 7.9** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांपैकी 29 (85 टक्के) नागरी स्थानिक संस्थांनी मलनिःसारण जाळ्यांची 100 टक्के संकलन कार्यक्षमता गाठली नव्हती **(परिशिष्ट 7.3)**.
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था ज्यांनी लक्ष्य प्रकाशित केले होते त्यापैकी 32 नागरी स्थानिक संस्थांमधील शासकीय अधिसूचनेत एकतर लक्ष्य शून्य होते, किंवा साध्य उपलब्ध नव्हते. उर्वरित सहा नागरी स्थानिक संस्थांपैकी 67 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (सहापैकी चार) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते तर दोन नागरी स्थानिक संस्था त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य करू शकल्या नाहीत **(परिशिष्ट 7.4)**.

अशाप्रकारे, चाचणी-तपासणी केलेल्या बहुसंख्य नागरी स्थानिक संस्थांमधील संकलन कार्यक्षमता सेवा स्तर निकष निर्देशकापेक्षा कमी होती.

### 7.2.4 मलनिःसारण प्रक्रिया क्षमतेची पर्याप्तता

पर्याप्तता ही समान कालावधीसाठी प्रमाणक स्थापक सांडपाणी निर्मितीची टक्केवारी म्हणून उपलब्ध दुय्यम प्रक्रिया क्षमता म्हणून दर्शविली जाते. सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, सांडपाणी प्रक्रिया क्षमतेची पर्याप्तता 100 टक्के साध्य करणे आवश्यक होते.

चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांमधील[9] सांडपाणी प्रक्रिया क्षमतेच्या पर्याप्ततेचे लेखापरीक्षेद्वारे केलेले विश्लेषण **तक्ता 7.10** मध्ये सारांशीत केले आहे.

[9] (1) बार्शी, (2) भातकुली, (3) चोपडा, (4) धामणगाव, (5) खुलताबाद, (6) मोटाळा, (7) निलंगा, (8) साक्री, (9) शिराळा आणि (10) यवतमाळ या नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

**तक्ता 7.10: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये सांडपाणी प्रक्रिया क्षमतेची पर्याप्तता**

| सांडपाणी प्रक्रिया क्षमतेची पर्याप्तता | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 5 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 2 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 टक्क्यांपेक्षा कमी | 2 |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 2 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 23 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

- **तक्ता 7.10** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांपैकी 29 (85 टक्के) नागरी स्थानिक संस्थांमध्ये पुरेशी सांडपाणी प्रक्रिया क्षमता नव्हती **(परिशिष्ट 7.3)**.
- चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी लक्ष्य प्रकाशित केले होते, त्यापैकी 31 नागरी स्थानिक संस्थांमधील शासकीय अधिसूचनेत एकतर लक्ष्य शून्य होते किंवा साध्यता उपलब्ध नव्हती. उर्वरित सात नागरी स्थानिक संस्थांपैकी 86 टक्के नागरी स्थानिक संस्थांनी (सातपैकी सहा) त्यांचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले नव्हते तर एका नागरी स्थानिक संस्थेने (त्र्यंबक) तिचे अंतर्गत लक्ष्य साध्य केले होते **(परिशिष्ट 7.4)**.

### 7.2.5 मलनि:सारण प्रक्रियेची गुणवत्ता

सांडपाण्याचा नमुना जो निर्दिष्ट दुय्यम प्रक्रिया मानके म्हणजेच मलनि:सारण प्रक्रिया संयंत्रामधून बाहेर पडणारा प्रक्रिया केलेल्या पाण्याचा नमुना हा मलनि:सारणाच्या दुय्यम प्रक्रियांच्या निश्चित केलेल्या मानकासमान असेल त्याची टक्केवारी मलनि:सारण प्रक्रियेची गुणवत्ता म्हणून मोजली जाते. सेवा स्तर निकष निर्देशकानुसार, मलनि:सारण प्रक्रियेची गुणवत्ता 100 टक्के साध्य करणे आवश्यक होते.

चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांमधील[10] लेखापरीक्षणाद्वारे केलेले मलनि:सारण प्रक्रियेच्या गुणवत्तेचे विश्लेषण **तक्ता 7.11** मध्ये सारांशित केले आहे.

**तक्ता 7.11: चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये मलनि:सारण प्रक्रियेची गुणवत्ता**

| मलनि:सारण प्रक्रियेची गुणवत्ता | नागरी स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|
| 100 टक्के | 6 |
| 75 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 100 टक्क्यांपेक्षा कमी | 4 |
| 50 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 75 टक्क्यांपेक्षा कमी | - |
| 25 टक्क्यांपेक्षा जास्त परंतु 50 टक्क्यांपेक्षा कमी | 1 |
| 25 टक्क्यांपेक्षा कमी | 23 |
| *स्रोत: नागरी स्थानिक संस्थांनी सादर केलेली माहिती* | |

[10] (1) बार्शी, (2) भातकुली, (3) चोपडा, (4) धामणगाव, (5) खुलताबाद, (6) मोटाळा, (7) निलंगा, (8) साक्री, (9) शिराळा आणि (10) यवतमाळ नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

**तक्ता 7.11** मध्ये दर्शविल्याप्रमाणे चाचणी-तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांपैकी 28 (82 टक्के) नागरी स्थानिक संस्थांनी मलनि:सारण प्रक्रियेची गुणवत्ता 100 टक्के साध्य केली नव्हती. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये प्रतिदिन निर्माण होणारा 2003 दशलक्ष लिटर मलप्रवाहापैकी 28 टक्के (552 दशलक्ष लिटर) हा प्रक्रिया केलेला नव्हता, 54 टक्के हा प्राथमिक प्रक्रिया केल्यानंतर सोडला, आणि 18 टक्के हा दुय्यम प्रक्रिया केल्यानंतर सोडला होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील आठ मलनि:सारण प्रक्रिया संयंत्रापैकी, तीन मलनि:सारण प्रक्रिया संयंत्रामध्ये[11] प्राथमिक मलनि:सारण प्रक्रिया सुविधा होती. तसेच, लेखापरीक्षेला सादर केलेल्या सहा मलनि:सारण प्रक्रिया संयंत्राच्या चाचणी अहवालात असे उघड झाले की, चार मलनि:सारण प्रक्रिया संयंत्रामधून[12] सोडला जाणारा मलप्रवाह हा, इतर गोष्टींबरोबरच जल (प्रतिबंध आणि जल नियंत्रण) अधिनियम, 1974 अंतर्गत असलेल्या बायोलॉजिकल ऑक्सिजन डिमांड, केमिकल ऑक्सिजन डिमांड आणि टोटल सस्पेंडेड सॉलिड यांच्यासाठीची मानके पूर्ण करत नव्हता. मुख्य अभियंता (मलनि:सारण प्रचालन), बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी उत्तरात सांगितले की, अस्तित्वात असलेली मलनि:सारण प्रक्रिया संयंत्रे ही 1992-2003 या दरम्यान कार्यान्वित झाली होती, जी वर्तमान मानके पूर्ण करू शकत नाहीत, आणि म्हणून मानकांचे पालन करण्यासाठी मलनि:सारण प्रक्रिया संयंत्रांची श्रेणीवाढ करण्याचे हाती घेण्यात आले आहे. सोडण्यात येणारा मलप्रवाह हा प्रदूषण मानके पूर्ण करत नाही, ही वस्तुस्थिती कायम राहते. चाचणी-तपासणी केलेल्या 38 नागरी स्थानिक संस्था, ज्यांनी लक्ष्ये प्रकाशित केली होती, त्यापैकी 34 नागरी स्थानिक संस्थांनी शासकीय अधिसूचनेत एकतर लक्ष्य शून्य होते किंवा साध्य उपलब्ध नव्हते. उर्वरित चार नागरी स्थानिक संस्थांपैकी तीन नागरी स्थानिक संस्थांनी त्यांचे स्वत:चे लक्ष्य साध्य केले होते तर एक नागरी स्थानिक संस्था (कुळगाव-बदलापूर) तिचे स्वत:चे लक्ष्य साध्य करू शकली नाही **(परिशिष्ट 7.4)**.

अशाप्रकारे, चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमधील मलनि:सारण प्रक्रिया क्षमता केवळ अपुरीच नव्हती तर मलनि:सारण प्रक्रियांची गुणवत्ताही निकृष्ट होती.

निर्गमन बैठकीत, प्रधान सचिवांनी (फेब्रुवारी 2022) सांगितले की कामगिरी सुधारण्याचे प्रयत्न केले जातील आणि असे ही नमूद केले की सर्व नागरी स्थानिक संस्थांद्वारे लक्ष्य आणि साध्ये अधिसूचित करण्यासाठी सूचना जारी केल्या जातील.

***शिफारस 12: पाणीपुरवठा आणि मलनि:सारण सेवांशी संबंधित सेवा स्तर निकष साध्य करण्यासाठी शासनाने नागरी स्थानिक संस्थांच्या सुमार कामगिरीचे पुनरावलोकन करावे आणि कालबद्ध पद्धतीने त्याच्या सुधारणेसाठी पावले उचलावीत.***

[11] वरळी, बांद्रा आणि मालाड

[12] घाटकोपर, भांडुप, वर्सोवा, मालाड

***शिफारस 13: शासनाने महसुलाची हानी टाळण्यासाठी आणि संकलन क्षमता वाढविण्याकरिता सर्व नागरी स्थानिक संस्थांमध्ये पाण्याच्या जोडण्यांचे जलमापन 100 टक्के करण्याची खात्री करावी, ज्यायोगे नागरी स्थानिक संस्थांच्या आर्थिक संसाधनांमध्ये वाढ होईल.***

## 7.3 अग्निशमन सेवा पुरवण्यातील परिणामकारकता

अग्निशमन सेवा ही नागरी स्थानिक संस्थांच्या अनिवार्य कार्यांपैकी एक आहे. नगर नियोजन व इमारत बांधकामांमध्ये अग्नि प्रतिबंध आणि संबंधित सुरक्षा उपाय हे एक अविभाज्य अंग आहे. अग्निसंबंधित दुर्घटनांमधून निर्माण होणाऱ्या कोणत्याही विचित्र परिस्थितीशी लढण्यासाठी अग्निशमन सेवा ही जीवन व मालमत्ता वाचवण्यासाठी प्रथम प्रतिसाद म्हणून संघटित केली आहे. त्यामुळे, नागरी स्थानिक संस्थांनी त्यांची कार्ये प्रभावीपणे व कार्यक्षमतेने पार पाडली पाहिजेत.

### 7.3.1 अग्नि सुरक्षा निधी स्थापन न करणे

महाराष्ट्र अग्नि प्रतिबंध व जीवन सुरक्षा उपाय अधिनियम, 2006 च्या कलम 25(1) मध्ये अग्निसुरक्षा निधी स्थापन करणे निर्धारित केले आहे. नगर विकास विभाग यांनी अग्निशमन सेवा शुल्काचा आकारावयाचा दर अधिसूचित (मार्च 2014) केला होता. इमारतीचे मालक आणि कब्जेदार यांच्याकडून नागरी स्थानिक संस्थांच्या अग्निशमन विभागाने लागू केलेले व गोळा केलेले शुल्क या निधीमध्ये जमा करावयाचे होते. हा निधी साधारणपणे अग्निशमन केंद्राची देखभाल, नगरपालिका हद्दीतील किंवा हद्दीबाहेरील कोणत्याही जागेवर वा इमारतींमध्ये आग विझवण्यासाठी व प्रतिबंध करण्यासाठी अत्याधुनिक उपकरणे व साधने पुरवणे यासाठी वापरावयाचा होता. लेखापरीक्षेला असे दिसून आले की चाचणी- तपासणी केलेल्या 44 नागरी स्थानिक संस्थांपैकी 25 नागरी स्थानिक संस्थांनी अग्निशमन विभागाने शुल्क लागू करून आकारलेले असताना देखील अग्निशमन निधी स्थापन केला नव्हता.

### 7.3.2 मनुष्यबळाची पर्याप्तता

आपत्तीच्या वेळी जलद प्रतिसाद आणि बचाव कार्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ पर्याप्त असणे महत्त्वाचे असते. चाचणी-तपासणी केलेल्या 44 नागरी स्थानिक संस्थांमध्ये लेखापरीक्षेला खालील गोष्टी निदर्शनास आल्या.

- 43 नागरी स्थानिक संस्थांमध्ये[13] मंजूर 6,688 अग्निशमन कर्मचारी पदांपैकी 3,313 पदे (50 टक्के) रिक्त होती.
- चाचणी-तापसणी केलेल्या आठ महानगरपालिकांपैकी बृहन्मुंबई, अमरावती, लातूर, नागपूर, नाशिक, ठाणे व वसई-विरार या सात महानगर पालिकांमध्ये मुख्य अग्निशमन अधिका-याचे पद एकतर रिक्त होते किंवा कनिष्ठ श्रेणीतील

---

13 उस्मानाबाद नगरपरिषदेने मंजूर पदे व कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या सादर केली नाही

अधिका-याकडे होते. चाचणी-तपासणी केलेल्या 35 नगरपरिषदा/नगर पंचायतींपैकी[14] 34 मध्ये (97 टक्के) अग्निशमन अधिका-याचे पद रिक्त होते.

- महानगर अग्निशमन सेवा वर्ग 'अ' मधील 17 पदांवर आणि नगरपालिका अग्निशमन सेवा वर्ग 'ब' मधील 90 पदांवर कोणाचीही नियुक्ती झाली नव्हती. शिवाय, महानगर अग्निशमन सेवा वर्ग 'क' मधील 360 मंजूर पदांपैकी 319 पदे (89 टक्के) रिक्त होती.

### 7.3.3 अग्निशमन स्थानकांची कमतरता

शीघ्र प्रतिसादासाठी पर्याप्त अग्निशमन स्थानके आवश्यक असतात. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने स्थापन केलेले स्थायी अग्निशमन सल्लागार परिषद या उच्चतम संस्थेने प्रतिसाद कालावधी, धोके व लोकसंख्येवर आधारीत अग्निशमन सेवांसाठी मानके प्रस्थापित केली (ऑगस्ट 2006) मानकांनुसार शहरी विभागांमध्ये प्रत्येकी 10 चौ.मी. साठी एक अग्निशमन स्थानक असणे आवश्यक होते.

लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की चाचणी- तपासणी केलेल्या 34 नागरी स्थानिक संस्थांपैकी[15] 17 मध्ये मानकानुसार अग्निशमन स्थानके उपलब्ध होती तर 17 नागरी स्थानिक संस्थांमध्ये आवश्यक 120 अग्निशमन स्थानकांऐवजी केवळ 73 अग्निशमन स्थानके (61 टक्के) उपलब्ध होती **(परिशिष्ट 7.5)**.

निर्गमन बैठकीदरम्यान प्रधान सचिवांनी सांगितले (फेब्रुवारी 2022) की नियुक्तीचे नियम व कर्मचारीवृंद आकृतीबंध अंतिम झाला आहे आणि रिक्त जागा कमी करण्यासाठी कार्यवाही केली जाईल. प्रधान सचिवांनी पुढे असेही सांगितले की अग्निशमन निधी स्थापन करण्याविषयी निर्देश दिले जातील आणि अग्निशमन स्थानकांच्या कमतरतेच्या मुददयाची सुध्दा दखल घेतली जाईल.

***शिफारस 14: नागरी स्थानिक संस्थांमधील अग्निशमन स्थानकांच्या कमतरतेच्या मुद्दयाची शासनाने प्राधान्याने दखल घ्यावी.***

## 7.4 निष्कर्ष

1 जून 1993 पासून अंमलात आलेल्या ह्या संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 ने भाग IXए (नगरपालिका) आणि अनुसूची XII लागू केले. संविधान सुधारणा अधिनियमाने नागरी स्थानिक संस्थांना शक्ती आणि अधिकार प्रदान करण्यासाठी आणि बाराव्या अनुसूचीमध्ये समावेश असलेल्या 18 कार्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्यांच्या हस्तांतरणासाठी तरतुदी करण्यासाठी आवश्यक

[14] उस्मानाबाद नगरपरिषदेने मंजूर पदे व कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या सादर केली नाही

[15] (1) अलिबाग, (2) खुलताबाद, (3) लाखनी, (4) मोटाळा, (5) नंदुरबार, (6) उस्मानाबाद, (7) शिराळा, (8) शिरूर-अनंतपाल, (9) सिंदखेड आणि (10) त्र्यंबक या नागरी स्थानिक संस्थांनी माहिती सादर केली नाही

असलेले कायदे करण्यासाठी राज्य विधानमंडळाला अधिकृत केले. महाराष्ट्रात चौऱ्याहत्तराव्या संविधान सुधारणेच्या अनुपालनासाठी नागरी स्थानिक संस्थांना शासित करणाऱ्या तीनही अधिनियमांमध्ये सुधारणा केल्या गेल्या. राज्य शासनाने जरी सर्व 18 कार्ये हस्तांतरित केली होती तरी पाणीपुरवठा; सार्वजनिक दवाखाने उघडणे व त्यांची देखभाल आणि सार्वजनिक वैद्यकीय मदत पुरवणे; पाणीपुरवठा, रस्ते व सार्वजनिक स्वच्छतागृहे यासारख्या मूलभूत सुविधा झोपडपट्ट्यांमध्ये पुरवणे; इमारतींना परवानगी देणे; इमारतींना बांधकामाचा प्रारंभ आणि भोगवटा प्रमाणपत्र ही सुद्धा शासनसदृश (पॅरास्टेटल) अभिकरणांद्वारे केली जात होती. यामुळे नागरी स्थानिक संस्थांकडे परिकल्पित हस्तांतरण आणि सक्षमीकरण असंहत (डायल्यूट) झाले.

राज्यातील नागरी स्थानिक संस्थांमधील महापौर व अध्यक्ष जनतेद्वारे थेट निवडले जात नव्हते व त्यांचा कार्यकाळ नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यकाळाशी समसीम नव्हता. जिल्ह्यांमध्ये जिल्हा नियोजन समिति आणि महानगर क्षेत्रांमध्ये महानगर नियोजन समिति स्थापन करण्यात आली होती. जिल्हा नियोजन समितीने कोणत्याही जिल्हयामध्ये पंचवार्षिक योजना व सम्यकदर्शी विकास योजना तयार केल्या नव्हत्या. जरी प्रभाग समित्या स्थापन केल्या होत्या तरी, चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये प्रभाग समिति स्थापन करण्यात कमतरता होती. राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात, राज्य वित्त आयोगाने अहवाल सादर करण्यात आणि राज्य वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी राज्य शासनाने विचारात घेण्यात विलंब झाला होता.

चाचणी-तपासणी केलेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये 2015-16 ते 2019-20 या कालावधीत मालमत्ता कर संकलन कार्यक्षमतेची टक्केवारी 53 टक्के होती तर त्याच कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेची संकलन कार्यक्षमता केवळ 28 टक्के होती. सर्व नागरी स्थानिक संस्थांना मालमत्ता कर आकारणीसाठी स्वतंत्र आणि पारदर्शक प्रक्रिया राबविण्यास मदत करण्यासाठी स्थापन करावयाचे मालमत्ता कर मंडळ स्थापन केले नव्हते. महापालिका अधिनियमांनी नागरी स्थानिक संस्थांना एक टक्का अतिरिक्त मुद्रांक शुल्क नियत केलेले असूनही 2015-16 ते 2020-21 दरम्यान ₹ 1,220.22 कोटीचे कमी वितरण झाले. महागाई भत्ता अनुदान आणि जकात कर रद्द केल्यामुळे उत्पन्नाचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी नगर परिषदेला हस्तांतरित केले जाणारे 'नगरपालिका सहायक अनुदान' स्वरुपात दिल्या जाणा-या राज्य शासन अनुदानात दरवर्षी 10 टक्के वाढ न केल्यामुळे 2016-17 ते 2020-21 दरम्यान ₹ 1,261.84 कोटींचे कमी वितरण झाले. नागरी स्थानिक संस्थांना यात्रा कर आणि रस्ते अनुदानापोटी ₹ 1,417.31 कोटींचे कमी वितरण झाले.

चाचणी-तपासणी केलेल्या 44 नागरी स्थानिक संस्थांमध्ये मंजूर पदांच्या तुलनेत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या संख्येत बरीच तफावत होती. राज्यात नगर परिषदा आणि

नगर पंचायतींचे प्रमुख असलेल्या मुख्य अधिकाऱ्यांची 80 पदे रिक्त होती. बहुतांश नागरी स्थानिक संस्थांनी पाणीपुरवठा आणि मलनि:सारण सेवांचे सेवा स्तर निकष साध्य केले नव्हते. नागरी स्थानिक संस्थांमध्ये अग्निशमन स्थानके आणि अग्निशमन सेवेतील मनुष्यबळ याची कमतरता होती. चाचणी-तपासणी केलेल्या 43 नागरी स्थानिक संस्थांमध्ये मनुष्यबळ कमतरता (अग्निशमन कर्मचारी) 50 टक्के होती.

**(एस के जयपुरियार)**

मुंबई, प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I,

दिनांक : 05 जुलै 2022 महाराष्ट्र, मुंबई

प्रतिस्वाक्षरित

**(गिरीश चंद्र मुर्मू)**

नवी दिल्ली, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

दिनांक : 11 जुलै 2022